४७४

(2)

**महाराष्ट्र शासन**

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग

भूमि संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर

दूरध्वनी क्र.(०२३१) २६४२७५३

Email- slao11kolapur@gmail.com

१०९१, सी वॉर्ड, बिंदूचौक, कोल्हापूर

जा.क्र./एलएक्यू/स्पे/४७४/ इचलकरंजी /भूसंविअ-११को/ १०७ दिनांक २० /०३/२०२६.

प्रति,

१. मा.जिल्हाधिकारी, (भूसंपादन शाखा) कोल्हापूर.
२. मा. आयुक्त तथा प्रशासक इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
३. मा. उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी, जि.कोल्हापूर
४. अप्पर तहसिलदार, इचलकरंजी, जि.कोल्हापूर
५. नगर भूमापन अधिकारी, इचलकरंजी, जि.कोल्हापूर
६. ग्राम महसूल अधिकारी , शहापूर, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

जावक नंबर - 29944
24 MAR 2026
खाते - [illegible]

**विषय :-** **भूसंपादन इचलकरंजी - एलएक्यू/स्पे/४७४.**
मौ. शहापूर ता. हातकणंगले जि. सि.सं.नं.१८२७९ (गटनं.२४९अ), सि.सं.नं.१८२८० (गट नं.२४९अ), सि.सं.नं.१८२७८ (गट नं.२४९अ), सि.सं.नं. १८२७५ (गटनं.२५०), सि.सं.नं. १८२७६ (गट नं.२५०), सि.सं.नं.१८२७७ (गट नं.२५०), सि.सं.नं.१८२७३ (गट नं.२५१/१), सि.सं.नं.१८२७४ (गट नं.२५१/१), सि.सं.नं.१८२६८ (गट नं.२५२अ), सि.सं.नं. १८२७१ पै (गट नं.२५२अ), सि.सं.नं. १८२६९ (गट नं.२५२ ब), सि.सं.नं. १८२७० (गट नं.२५२ ब), सि.सं.नं. १८२७१ पै (गट नं.२५२ ब) या जमिनी इचलकरंजी शहराच्या मुळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३ मधूबन सोसायटी समोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्त्यासाठी भूसंपादन करणेबाबत.

**संदर्भ :-** दि. १२/०३/२०२६ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग- एक, पुणे विभागीय पुरवणी मध्ये पृष्ठ क्र.२४,२५ व २६ वर प्रसिध्द झालेली कलम १९ ची अधिसूचना.

महोदय,

विषयांकित भुसंपादन प्रकरणी नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ नुसारची दि.१२/०३/२०२६ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग- एक पुणे विभागीय पुरवणी मध्ये पृष्ठ क्र. २४,२५ व २६ वर प्रसिध्द झालेली आहे. सदरच्या राजपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तसेच विषयांकित प्रकरणी उक्त भुसंपादन अधिनियमाच्या कलम २१ च्या पोटकलम १ व २ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द करावयाच्या दि. /०३/२०२६ रोजीच्या प्रकटपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकरणी उक्त अधिनियमाच्या कलम १९ ची अधिसूचना व कलम २१ (१) (२) चे दि. /०३/२०२६ रोजीचे प्रकट पत्र आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर डकवून दोन दिवसात प्रसिध्द करावे व प्रसिध्द केल्याचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास न चुकता पाठवावा, ही विनंती.

आपली,

(प्रियांका धनवडे)
प्र. भूमी संपादन विशेष अधिकारी (११),
कोल्हापूर

सहपत्र - कलम १९ ची अधिसूचना प्रसिध्दीचे राजपत्र व कलम २१ (१)(२) चे प्रकट पत्र

**भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २१ च्या पोट कलम (१) व (२) अन्वये प्रसिध्द करावयाचे प्रकटपत्र.**

यावरुन जाहिररित्या जाणीव करुन देण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील दि.०४/०२/२०२६ ची क्र.कार्यासन-११/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/४७४/इचलकरंजी/११० अन्वयेची अधिसुचना दि. १२/०३/२०२६ चे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र. २४,२५ व २६ वर प्रसिध्द झालेली आहे.

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अधिसुचनेमध्ये नमुद शहापूर शहरात किंवा शहराजवळ असलेल्या जमिनींपैकी खाली दर्शविलेल्या सि.स.नं./ गट नं. मधील नुकतीच निशाणी केलेली, त्यावर असलेले झाडे झुडपे वगैरेसह खाली दर्शविल्याप्रमाणे कमी किंवा अधिक भरणारी जागा सरकारकडून लवकरच इचलकरंजी शहराच्या मुळ हद्यीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची मंजूर सुधारित विकास योजनेतील सि.सं.नं.१८२७९ (गटनं.२४९अ), सि.सं.नं.१८२८० (गट नं.२४९अ), सि.सं.नं.१८२७८ (गट नं.२४९अ), सि.सं.नं. १८२७५ (गटनं.२५०), सि.सं.नं. १८२७६ (गट नं.२५०), सि.सं.नं.१८२७७ (गट नं.२५०), सि.सं.नं.१८२७३ (गट नं.२५१/१), सि.सं.नं.१८२७४ (गट नं.२५१/१), सि.सं.नं.१८२६८ (गट नं.२५२अ), सि.सं.नं. १८२७१ पै (गट नं.२५२अ), सि.सं.नं. १८२६९ (गट नं.२५२ ब), सि.सं.नं. १८२७० (गट नं.२५२ ब), सि.सं.नं. १८२७१ पै (गट नं.२५२ ब) या जमिनी इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३ मधूबन सोसायटी समोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्ता यासार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात येणार आहे.

तरी सदरहू जमिनीत हितसंबध असलेल्या सर्व इसमांस यावरुन फर्मविण्यात येते की, त्यांनी भूमि संपादन विशेष अधिकारी (११), कोल्हापूर १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर यांच्या कार्यालयात दि.२८/०४/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजता जातीने अगर अभिकर्ता मार्फत हजर राहून सदरहु जमिनीतील आपआपल्या हितसंबधाचा प्रकार, त्यासंबंधात मिळावयाच्या मोबदल्याच्या रकमेचा तपशील व सदरहू अधिनियमाचे कलम २० अन्वये केलेल्या जागेच्या मोजणी संबंधी काही हरकती असल्यास त्याची संपूर्ण तपशीलवार माहिती दयावी, चुकू नये.

**परिशिष्ट**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव - शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर**

| सि. सं. नं. (ग.नं) | अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) | सि. सं. नं. | अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १८२७९ (२४९ अ) | ६२.०० | १८२७४ (२५१/१) | ९८.५० |
| १८२८० (२४९ अ) | ३४८.५० | १८२६८ (२५२अ) | २५४ |
| १८२७८ (२४९अ) | १.५० | १८२७१ पै (२५२अ) | ५.२२ |
| १८२७५ (२५०) | ३४९.४३ | १८२६९ (२५२ ब) | १२०.२० |
| १८२७६ (२५०) | २४.५० | १८२७० (२५२ ब) | ९९.३० |
| १८२७७ (२५०) | ४३.७० | १८२७१ पै (२५२ ब) | ४.०० |
| १८२७३ (२५१/१) | ४०१.१५ | | |
| एकुण क्षेत्र | १८१२ चौ.मी. | | |

**ज्यासाठी जमीन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन :-**

मौ. शहापूर ता. हातकणंगले जि. सि.सं.नं.१८२७९ (गटनं.२४९अ), सि.सं.नं.१८२८० (गट नं.२४९अ), सि.सं.नं.१८२७८ (गट नं.२४९अ), सि.सं.नं. १८२७५ (गटनं.२५०), सि.सं.नं. १८२७६ (गट नं.२५०), सि.सं.नं.१८२७७ (गट नं.२५०), सि.सं.नं.१८२७३ (गट नं.२५१/१), सि.सं.नं.१८२७४ (गट नं.२५१/१), सि.सं.नं.१८२६८ (गट नं.२५२अ), सि.सं.नं. १८२७१ पै (गट नं.२५२अ), सि.सं.नं. १८२६९ (गट नं.२५२ ब), सि.सं.नं. १८२७० (गट नं.२५२ ब), सि.सं.नं. १८२७१ पै (गट नं.२५२ ब) या जमिनी इचलकरंजी शहराच्या मुळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३ मधूबन सोसायटी समोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्त्यासाठी भूसंपादन करणे.

जा.क्र. एलएक्यू/स्पे/४७४/ इचलकरंजी /भूसंविअ-११को/ ९०८
दिनांक : २०/०३/२०२६
ठिकाण : १०९१, सी वॉर्ड, बिंदूचौक, कोल्हापूर

(प्रियांका धनवडे)
प्र. भूमी संपादन विशेष अधिकारी (११)
कोल्हापूर

भूमि संपादन विशेष अधिकारी (११)
सत्यमेव जयते
कोल्हापूर

## जिल्हाधिकारी यांजकडून

### जिल्हा कोल्हापूर

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ खालील*

## अधिसूचना

### (नमुना - १अ)

क्रमांक कार्यासन-१९/भूसं/आरआर/एलएक्यू/स्पे/४७४/इचलकरंजी/११०/२०२६.—ज्याअर्थी, इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राची व वाढीव हद्दीची सुधारित विकास योजना (यात यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे "उक्त नगर रचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला) चे कलम ३१ *(१)* नुसार नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१११/१३५२/सीआर-१९/१२/डी.पी. सॅन्क्शन/यूडी-१३, दिनांक २४ मे २०१२ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १० जुलै २०१२ पासून अमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे शहापूर, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली सि.स.नं. १८२७९ (गट नं. २४९-अ), सि.स.नं. १८२८० (गट नं. २४९-अ), सि.स.नं. १८२७८ (गट नं. २४९-अ), सि.स.नं. १८२७५ (गट नं. २५०), सि.स.नं. १८२७६ (गट नं. २५०), सि.स.नं. १८२७७ (गट नं. २५०), सि.स.नं. १८२७३ (गट नं. २५१/१), सि.स.नं. १८२७४ (गट नं. २५१/१), सि.स.नं. १८२६८ (गट नं. २५२-अ), सि.स.नं. १८२७१ पै. (गट नं. २५२-अ), सि.स.नं. १८२६९ (गट नं. २५२-ब), सि.स.नं. १८२७० (गट नं. २५२-ब), सि.स.नं. १८२७१ पै. (गट नं. २५२-ब), (यात यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेली) या जमिनी इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३, मधुबन सोसायटीसमोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत. (यात यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेले) ;

आणि ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२६ अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे दिनांक ३० जानेवारी २०१९ चे पत्र क्र. टी.पी./४८७८/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खालील अधिसूचना क्र. टीपीएस-२१७५/५१०६/यूडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. एमआयएस-११/२०१४/सीआर-७७(पार्ट-२)/ए-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ अन्वये, भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत भूसंपादनाच्या कार्यवाहीसाठी सुमारे १०,००० हे. क्षेत्राच्या मर्यादेत समुचित शासन म्हणून शासनाचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगर रचना अधिनियम अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनींच्या संदर्भात लागू होत नाहीत, तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ८ मार्च २०१९ चे पत्र क्र. टीपीएस/१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३ अन्वये, "उक्त नगर रचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना उक्त भूसंपादन अधिनियमातील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतचे परिशिष्ट-दोन व तीन, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत." अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेत इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३, मधुबन सोसायटीसमोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्ता यासाठी आरक्षित केलेल्या जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता असल्याबाबत समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसानभरपाईची संपूर्ण रक्कम उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगर रचना अधिनियमाच्या १२६, पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत.

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, कोल्हापूर उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन, विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

त्याचप्रमाणे उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करणेबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

## अनुसूची - एक

### संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

### जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गावाचे नाव शहापूर

| सि.स.नं. (ग.नं.) | अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) | सि.स.नं. | अंदाजित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १८२७९ (२४९-अ) | ६२.०० | १८२७४ (२५१/१) | ९८.५० |
| १८२८० (२४९-अ) | ३४८.५० | १८२६८ (२५२-अ) | २५४ |
| १८२७८ (२४९-अ) | १.५० | १८२७१ पै. (२५२-अ) | ५.२२ |
| १८२७५ (२५०) | ३४९.४३ | १८२६९ (२५२-ब) | १२०.२० |
| १८२७६ (२५०) | २४.५० | १८२७० (२५२-ब) | ९९.३० |
| १८२७७ (२५०) | ४३.७० | १८२७१ पै. (२५२-ब) | ४.०० |
| १८२७३ (२५१/१) | ४०१.१५ | | |
| **एकूण क्षेत्र** | | **१८१२ चौ.मी.** | |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- मौजे शहापूर, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, सि.स.नं. १८२७९ (गट नं. २४९-अ), सि.स.नं. १८२८० (गट नं. २४९-अ), सि.स.नं. १८२७८ (गट नं. २४९-अ), सि.स.नं. १८२७५ (गट नं. २५०), सि.स.नं. १८२७६ (गट नं. २५०), सि.स.नं. १८२७७ (गट नं. २५०), सि.स.नं. १८२७३ (गट नं. २५१/१), सि.स.नं. १८२७४ (गट नं. २५१/१), सि.स.नं. १८२६८ (गट नं. २५२-अ), सि.स.नं. १८२७१ पै. (गट नं. २५२-अ), सि.स.नं. १८२६९ (गट नं. २५२-ब), सि.स.नं. १८२७० (गट नं. २५२-ब), सि.स.नं. १८२७१ पै. (गट नं. २५२-ब) या जमिनी इचलकरंजी शहराच्या मूळ हद्दीच्या भागश: क्षेत्राच्या व वाढीव हद्दीच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३, मधुबन सोसायटीसमोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्त्यासाठी भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** :- इचलकरंजी हद्दीतील प्रभाग क्र. ३, मधुबन सोसायटीसमोरील जाणारा उत्तर-दक्षिण १२ मी. रुंद विकास योजना रस्त्यासाठी भूसंपादन करणे.

**समाजाला होणारा लाभ** :- पायाभूत सुविधा, सोयी सुविधा.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले, गावाचे नाव शहापूर

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | हे.आर. |
| निरंक | निरंक | निरंक |

लागू नाही.

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

निरंक

**टीप :--** उक्त जमिनींचा नकाशा भूमी संपादन, विशेष अधिकारी (११), कोल्हापूर यांच्या १०९१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.

**अमोल येडगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

कोल्हापूर, ४ फेब्रुवारी २०२६

---

**दुरुस्ती अधिसूचना**

क्रमांक भूमापन/गुंडाळवाडी/पमज/ग.नं.२३/२०२५.—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक टी.एल.सी.-१०६९/३२८१० चे (विशेष) दिनांक १ नोव्हेंबर १९७० अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) याचे कलम ४, पोट-कलम *(१)* च्या परंतुकाअन्वये राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत त्याचा वापर करून मी, जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, पुणे, याद्वारे दिनांक २०२५ पासून,

अ) पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील बिबी या गावाचे धरणाखाली गेलेले सर्व्हे नंबरचे क्षेत्र वगळून उर्वरित सर्व्हे नंबर मौजे गुंडाळवाडी व बुरसेवाडी या गावात घेऊन मा. अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील क्रमांक पमज/९१०/चार/९६, शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक टी.एस.पी.-१०७६,६३९२३/ग-६, दिनांक १ जुलै १९९६ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध झालेली आहे. त्यानुसार मौजे बुरसेवाडी व गुंडाळवाडी ही दोन महसुली गावे तयार होऊन त्याप्रमाणे गावी १९९६ साली गाव नमुना नंबर १ आकारबंद तयार करून सन २००५ सालापासून अधिकार अभिलेखास अंमल चालू आहे. मौजे बुरसेवाडी गावामध्ये समाविष्ट केलेले जुने सर्व्हे नंबर १५४ पै. व १५५, नवीन सर्व्हे नंबर १३ व १४ हे मौजे गुंडाळवाडी गावाचे हद्दीत समाविष्ट करून त्यांच्या हद्दीत सीमामध्ये बदल करत आहे.

आणि

ब) असा निर्देश देत आहे की,

(१) बुरसेवाडी गावाच्या क्षेत्र भूमापन क्रमांक (अनुसूची-ब मध्ये) समाविष्ट असलेले जुने सर्व्हे क्रमांक १५४ पै. व १५५, नवीन सर्व्हे क्रमांक १३ व १४ चे स्थानिक क्षेत्र वगळून पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील गुंडाळवाडी या गावामध्ये समाविष्ट करत आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील बिबी, या गावाचे सोबतच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेल्या बुरसेवाडीमधील सर्व्हे क्र. १५४ पै. व १५५, नवीन सर्व्हे क्रमांक १३ व १४ हे गुंडाळवाडी या नावाने ओळखण्यात येणाऱ्या गावामध्ये समाविष्ट करीत आहे.

(३) बुरसेवाडी व गुंडाळवाडी या गावाच्या रहिवाशांचे दोन्ही गावांमध्ये गुरे चरणेकामी स्मशानभूमी, गावठाण अस्तित्वात असलेले रस्ते इत्यादी वापरात असलेल्या सार्वजनिक बाबींवर त्यांचे समान हक्क राहतील.

**अधिसूची - अ (भूमापन क्रमांक)**

**बुरसेवाडी :-** जुने सर्व्हे नं. १४७ पै., १४८ ते १५२, १५६, १५७ पै., १५८, १५९, १६० पै., १६१ ते १८९, १९० पै. १९१ ते १९६, १९७ पै., १९८ ते २२८, २२९ पै., २३० पै., २३१ ते २३३, २३४ पै., २३५ पै., २३६ पै., २३७ ते २४०, २४१ पै., २७६ ते २८२, २८३ पै., २८४ ते २८८, २८९ पै.

**अधिसूची - ब (भूमापन क्रमांक)**

**गुंडाळवाडी :-** समाविष्ट करणेचे जुना सर्व्हे नं. १५४ पै., १५५, नवीन सर्व्हे नंबर १३ व १४ असे.

**जितेंद्र डुडी,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, २४ फेब्रुवारी २०२६.

---